# पौलाने लिहलेले करिंथकरास पहिले पत्र
# पौलनी लिखेल करिंथकरसले पहिलं पत्र
## वळख

हाई पत्र प्रेषित पौल यानी येशु ख्रिस्तना जन्मनंतर ५५ सालमा लिखं१:१ पौलनी करिंथकर मंडळीले ज्या दोन पत्र लिखात त्यानापैकी हाई पहिलं पुस्तक. मासेदोनिया प्रांतकडे जातांना अनं परत येतांना जी भेट त्यानी ठरायेल व्हती त्याना पहिले इफिस शहरमा असतांना त्यानी हाई पत्र लिखेल व्हई१६:५-९पौलले करिंथ मंडळीमा चालणारा चुकीन्या चालीरीतीसबद्दल, गटबाजी, व्यभिचार, जारकर्म याबद्दलना अहवाल भेटेल व्हता त्याले उत्तर म्हणीसन त्यानी हाई पत्र लिखं. हाई शहर व्यभिचारकरता प्रसिध्द व्हतं म्हणीसन हाई स्वभावीक व्हतं की हाई समस्या तठला मंडळीमा बी घुसन्यात, करिंथकरसले पहिला पत्रमा एक प्रसिध्द अध्याय जो प्रितीवर आधारीत शे. १३

रूपरेषा

१. पौलनी करिंथकरसले शुभेच्छा अनी त्यानाकरता देवना आभार. १:१-९
२. पौलनी जो अहवाल करिंथना मंडळीसबद्दल ऐका, त्यानं उत्तर. १:१०; ४:२१
३. लैंगिक अनैतीकतानी अडचण अनी एकमेकसले न्यायालयमा खेचनं याबद्दल तो चर्चा करतो. ५—६
४. लगीननी अडचण अनी मुर्तिना नैवेघ, एकत्र आराधना, आत्माना दानं, पुनरूत्थान यानाद्दल सुचना. ७—१५
५. काही व्यवहारीक अनी वैयक्तीक गोष्टीसले पौलनं उत्तर अनी पत्रना शेवट. १६

1 देवनी ईच्छातीन येशु ख्रिस्तना प्रेषित व्हवाकरता बलायेल मी पौल अनं
आपला भाऊ सोस्थनेस यांच्याकडून,
2 ✡करिंथ गावमाधला देवनी मंडळीले, म्हणजे ख्रिस्त येशुमा पवित्र करेल अनं
पवित्र व्हवाकरता बलायेल एकत्र लोकसले अनी आपला प्रभु येशु ख्रिस्त, म्हणजे
त्यासना अनं आपला बी प्रभु, यानं नाव सर्व जागावर लेणारा सर्वासले;
3 देव आपला अनं त्यासना पिता प्रभु येशु यापाईन तुमले कृपा अनं शांती असो.

✡ **1:2** १:२ प्रेषित १८:१

## येशुमा एकत्र व्हवामुये आशिर्वाद

4 ख्रिस्त येशुमा तुमनावर व्हयेल देवना अनुग्रहमूये मी कायम तुमनाबद्दल आपला
देवनं उपकारस्मरण करस.
5 यामुये की तुम्हीन येशु ख्रिस्तमा एकत्र व्हवामुये प्रत्येक गोष्टीसमा म्हणजे
सर्वकाही बोलामा अनी सर्व ज्ञानमा संपन्न व्हयनात;
6 जसं की ख्रिस्तबद्दलना संदेश तुमनामा भक्कम व्हयना.
7 अस की, आपला प्रभु येशु ख्रिस्त यानी प्रकट व्हवानी वाट दखणारा तुम्हीन
कोणता बी कृपादानमा कमी पडवुत नही.
8 तो तुमले शेवटपावत भक्कम करी ठी; यामुये की आपला प्रभु येशुना परत
येवाना दिनले तुम्हीन निर्दोष ठरशात.
9 तो देव ईश्वसनीय शे. ज्यानी तुमले त्याना पुत्र म्हणजे आमना प्रभु येशु ख्रिस्तना
सहभागीतामा बलावं.

## ख्रिस्ती मंडळीसमा फुट

10 भाऊ बहिणीसवन, आपला प्रभु येशु ख्रिस्त याना नावतीन मी तुमले ईनंती
करस की, तुम्हीन सर्वासनी सारखंच बोलाले पाहिजे, म्हणजे तुमनामा फुट पडाले
नको, पण तुम्हीन एक मन अनी एकच ईचारतीन र्‍हावाले पाहिजे.
11 भाऊ बहिणीसवन, तुमनामा भांडणं शेतस अस माले खिया परिवार कडतीन
माहीत पडेल शे.
12 ✡मनं सांगनं अस शे की; तुमनामाधला प्रत्येकजण म्हणस, “मी पौलना, मी
अपुल्लोसना, मी केफाना अनी मी ख्रिस्तना शिष्य शे.”
13 ख्रिस्तना असा भाग पडेल शेतस का? पौलले तुमनाकरता क्रुसखांबवर
खिळेल व्हतं का? पौलना नावतीन तुमना बाप्तिस्मा व्हयना का?
14 ✡क्रिस्प अनं गायस यासना शिवाय मी तुमना मातीन कोणाच बाप्तिस्मा करा
नही,
15 हाई यानाकरता व्हयनं की तुमना बाप्तिस्मा मना नावमा व्हयना अस कोणी
म्हणाले नको.
16 ✡अनी हो, मी स्तेफनना घरनासना बी बाप्तिस्मा करा; त्यासनाशिवाय मी
दुसरासना बाप्तिस्मा करा की नही हाई मना ध्यानमा नही.

---

✡ **1:12** १:१२ प्रेषित १८:२४ ✡ **1:14** १:१४ प्रेषित १८:८; प्रेषित १९:२९; रोम १६:२३ ✡ **1:16** १:१६ १ करिंथ १६:१५

17 ख्रिस्तनी माले बाप्तिस्मा कराले नही, तर सुवार्ता सांगाले धाडेल शे, पण
ख्रिस्तना क्रुसखांबवरलं मरण अनी त्यानं सामर्थ्य वाया जावाले नको म्हणीसन ती
मनुष्यनी बुध्दीनी भाषामा सांगाले नही धाडं.

### ख्रिस्तनं ज्ञान अनी सामर्थ्य

18 कारण ज्यासना नाश व्हणार शे त्यासनं क्रुसखांबबद्दल शिक्षण मुर्खपण शे;
पण ज्यासले तारण प्राप्त व्हई राहीना असा आपलासले ते देवनं सामर्थ्य शे.
19 "मी ज्ञानीसनं ज्ञान नष्ट करसु अनं बुध्दिवानसनी बुध्दी व्यर्थ करसु, असा
शास्त्रलेख शे."
20 या युगना, ज्ञानी, शास्त्री, वाद करनारा कोठे शेतस? देवनी जगनं ज्ञान
मुर्खपणनं ठरायं की नही?
21 कारण जग देवना ज्ञानतीन वेढायेल शे तरी या जगनी आपला ज्ञानतीन देवले
वळखं नही, तवय देवले हाई चांगलं वाटनं की हाई वार्तांना प्रचारना मुर्खपणतीन
ईश्वास ठेवणारा लोकसना उध्दार कराना.
22 कारण यहूदी चिन्ह चमत्कार मांगतस अनी हेल्लेणी ज्ञानना शोध करतस.
23 आम्हीन क्रुसखांबवर खियेल ख्रिस्तले गाजाडतस; हाऊ यहूदी लोकसले
अडखळण अनी गैरयहूदी लोकसकरता मुर्खपण शे.
24 पण ज्यासले देवनी बलायेल शे, त्या दोन्ही यहूदी अनं गैरयहूदी ख्रिस्त प्रभुनं
सामर्थ्य अनं परमेश्वरनं ज्ञान शे.
25 कारण देवना मुर्खपणा मनुष्यसना ज्ञानपेक्षा जास्त ज्ञानवान शे, अनी देवना
अशक्तपणा मनुष्यसना शक्तीतीन जास्त शक्तीशाली शे.
26 हे बंधुसवन, तुमले बलायेल शे यानावर ईचार करा, मनुष्यना दृष्टीतीन
तुमनामातिन कोणी जास्त बुध्दिमान नही, कोणी जास्त शक्तीशाली नही अनी कोणी
मोठा खानदानना नही.
27 तरी ज्ञानीसले लाजाडाकरता ज्यासले जगनी मुर्ख समजा देवनी त्यासले
निवाडं अनी शक्तीशालीसले लाजाडाकरता देवनी दुबळासले निवाडं;
28 अनी देवनी असा गोष्टीसले निवड्यात ज्या संसारनी दृष्टीमा काहीच कामना
नहीत, धिक्कारेल असासले देवनी यानाकरता निवाडं की ज्या गोष्टी संसारनी दृष्टीमा
महत्त्वन्या गोष्टी शेतस त्यासले नष्ट करानं.
29 म्हणीसन देवनी अस करं की, कोणताच प्राणी देवना समोर गर्व कराले नको.
30 पण देवनी आमले येशुमा एकत्र करेल शे, देवनी येशु ख्रिस्तले आमनं ज्ञान
बनाडं, आम्हीन त्यानाद्वारा देवसमोर न्यायी ठरनुत, पवित्र, स्वतंत्र बनाडं,

31 यानाकरता की, “जो गर्व करस त्यानी तो प्रभुबद्दल कराले पाहिजे असा
शास्त्रलेख शे.”

# 2

## क्रुसखांबवर मरेल येशुना संदेश

1 भाऊ बहिणींसवन, मी तुमनाकडे वनु तो बोलानं चातुर्य अनी ज्ञानतीन श्रेष्ठ शे
म्हणीसन देवनं रहस्यमय सत्य तुमले सांगत वनु अस नही.
2 कारण मी हाई ठरायेल व्हतं की, तुमना क्रुसखांबवर खिळेल येशु ख्रिस्त अनी
त्याना मृत्युशिवाय दुसरी कोणतीच गोष्ट करानी नही.
3 ✡जवय मी तुमनाकडे वनु तवय अशक्त अनी घाबरेल व्हतु,
4 मना संदेश अनं मना प्रचार ज्ञानतीन भरेल शब्दसना नव्हता तर देवआत्माना
सामर्थ्यनं पुरावा व्हता.
5 याकरता की, तुमना ईश्वास मनुष्यना ज्ञानवर नही परमेश्वरना सामर्थ्यवर
ऱ्हावाले पाहिजे.

## देवनं राज्य

6 ज्या आत्मामा समजदार शेतस त्यासनामा आम्हीन ज्ञान सांगतस; पण ते ज्ञान
हाई युगनं नही शे अनी त्या अधिकारीसना सामर्थ्य बी ह्या युगमा संपतीन.
7 पण आम्हीन देवना त्या राज्यनं गुप्तज्ञान सांगतस, जे गुप्त व्हतं, ते देवनी जग
निर्माण व्हवाना पहिले आपला गौरवकरता निवाडं.
8 ते हाई युगना अधिकारीसमा कोणलेच समजस नही; त्यासले समजत तर त्या
गौरवना प्रभुले क्रुसखांबवर नही खिळतात.
9 हाई तर या शास्त्रलेखप्रमाणे शे; “डोळसघाई दखं नही, कानतीन ऐकं नही,
अनं माणससना मनमा वनं नही, त्यासले देवनी आपलावर प्रेमसकरता तयार करेल
शे.”
10 पण देवनी त्यासले स्वतःना आत्मातीन आपलावर प्रकट करं, कारण आत्मा
हाऊ सर्व गोष्टीसना अनी देवना मनुष्यसमा रहस्यना शोधक शे.
11 मनुष्यना आत्मा जो मनुष्यमा ऱ्हास, त्यानाशिवाय मनुष्यमाधल्या गोष्टी कोण
वळखस? तसच देवन्या गोष्टी देवना आत्माशिवाय कोणीच वळखत नही.
12 आपलाले जगना आत्मा नही, तर देवपाईन जो आत्मा शे, तो मिळना याकरता
की, जे देवनी आपलाले कृपातीन देयल शे ते आपण वळखाले पाहिजे.

✡ **2:3** २:३ प्रेषित १८:९

13 तर आम्हीन मनुष्यना ज्ञानतीन शिकाडेल शब्दसनी नही तर देवना आत्मातीन
शिकाडेल शब्दसनी, आत्माना गोष्टी ज्यासले आत्मा शे त्यासले सांगतस.
14 जो माणुस देवना आत्मान्या गोष्टी स्विकारस नही, कारण त्या त्याले
मुर्खपणन्या वाटतस; अनी त्यासले त्या वळखता येतस नही कारण त्यासनी पारख
आत्माघाई व्हस.
15 जो आत्मिक शे तो सर्व गोष्टी पारखस, तरी त्यानी स्वतःनी पारख
कोणाकडतीनच व्हत नही.
16 जसं शास्त्रलेख सांगस, "प्रभुनं मन अस कोणी वळखेल शे की त्यानी त्याले
शिकाडावं?" आपलाले ख्रिस्तनं मन शे.

# 3

## देवना सेवक

1 भाऊ बहिणीसवन, ज्यासले परमेश्वरना आत्मा शे त्या लोकससंगे बोलानं तसं
तुमनासंगे मनाघाई बोलायनं नही, तर जसं जगीक लोकससंगे अनी त्यासनासंगे ज्या
ख्रिस्तमा बालक शेतस.
2 ✡मी तुमले दुध पाजं, जेवण दिधं नही; कारण त्या येळले तुमनामा शक्ती
नव्हती, अनी अजुन बी नही;
3 कारण तुम्हीन अजुन जगीक लोकसमायक शेतस; तुमनामा हेवा अनं भांडणं
शेतस, यावरतीन तुम्हीन जगीक लोकसमायक शेतस का नही? अनी तुम्हीन
मनुष्यसना पध्दतघाई चालतस की नही?
4 ✡कारण एक सांगस मी पौलना शे; अनी दुसरा सांगस, मी अपुल्लोसना शे;
मंग तुम्हीन अस करीसन जगीक लोकसमायक जगी नही राहिनात का?
5 अपुल्लोस कोण शे? अनी पौल कोण शे? ज्यासनाद्वारे तुम्हीन ईश्वास ठेवा.
असा सेवक शेतस; जसं प्रत्येकले प्रभुनी कराले काम देयल शे तस प्रत्येकनी काम
कराले पाहिजे;
6 ✡मी लायं, अपुल्लोसनी पाणी टाकं, पण देवनी वाढायं.
7 यामुये लावणारा काही नही अनी पाणी टाकणारा पण काही नही; पण
वाढवणारा देवच सर्वकाही शे.

✡ **3:2** ३:२ इब्री ५:१२,१३ ✡ **3:4** ३:४ १ करिंथ १:१२ ✡ **3:6** ३:६ प्रेषित १८:४-११; प्रेषित १८:२४-२८

8 लावणारा अनी पाणी टाकणारा एकच शे, तरी प्रत्येकले देव आपआपला
कष्टप्रमाणे मजुरी दि.
9 कारण आम्हीन देवना सोबती शेतस. तुम्हीन देवनं वावर, देवनी इमारत शेतस.
10 मनावर व्हयेल देवनं अनुग्रहना मानतीन मी चतुर कारागीरनामायक पाया
घाला अनी दुसरा त्यानावर बांधस; तर प्रत्येकनी आपण त्यानावर कसं बांधी राहीनुत
यानाबद्दल जपानं.
11 बांधेल पाया येशु ख्रिस्त शे तठे कोणी दुसरा पाया नही घालु शकस.
12 काहीजण हाऊ पाया सोनं, चांदि, महागडा दगड, लाकुड, गवत, पेंढा यासनी
बांधतस.
13 तर बांधणारा प्रत्येकनं काम न्यायना दिनले उघड व्हई; तो आगसंगे प्रकट
व्हई अनी प्रत्येकनं काम कसं शे यानी परिक्षा आगच करी.
14 ज्यानं कोणं त्यानावर बांधेल काम टिकी त्याले मजुरी मिळी.
15 ज्यानं कोणं काम जळी जाई त्याना तोटा व्हई, पण तो वाची जाई जसं काय
आगमातीन बाहेर पडेल मायक.

16 ✡तुम्हीन देवनं मंदिर शेतस, अनी तुमनामा देवना आत्मा ऱ्हास हाई तुमले
माहीत नही का?
17 जर कोणी देवना मंदिरना नाश करी तर देव त्याना नाश करी. कारण देवनं
मंदिर पवित्र ऱ्हास तसा तुम्हीन पवित्र शेतस.

18 कोणी स्वतःले फसाडाले नको, जर तुमना मातीन कोणी ह्या युगमा स्वतःले
हुशार समजस तर त्यानी हुशार बनाकरता मुर्ख बनाणं.
19 कारण या जगनं ज्ञान देवसमोर मुर्खपण शे; "देव ज्ञानीसले त्यासनाच
धुर्तपणमा धरस" असा शास्त्रलेख शे;
20 अनी "प्रभु ज्ञानीसना ईचारसले असा वळखस की, त्या व्यर्थ शेतस," आखो
शास्त्रलेखमा अस बी म्हणस.
21 यामुये मनुष्यसवर कोणी गर्व कराले नको, सर्वकाही तुमनं शे;
22 पौल, अपुल्लोस, केफा, जग, जिवन, मरण, वर्तमान, भविष्य, हाई सर्व
तुमनं शे.
23 तुम्हीन ख्रिस्तना; अनी ख्रिस्त देवना.

✡ **3:16** ३:१६ १ करिंथ ६:१९; २ करिंथ ६:१६

# 4

## ख्रिस्तना प्रेषित

1 आम्हीन ख्रिस्तना सेवक अनी देवना रहस्यना कारभारी शेतस अस तुम्हीन
आमले मानानं.
2 आखो एक गोष्टनी गरज शे ती म्हणजे कारभारी म्हणं तर तो ईश्वासु राहवाले
पाहिजे.
3 तर तुमना कडतीन किंवा मानवी न्यायालयकडतीन मना न्यायनिवाडा व्हस,
तरी यानं बी माले काही वाटस नही, मी स्वतःना बी न्यायनिवाडा करस नही.
4 कारण मनं मन जरी मना विरोधमा साक्ष देस नही, पण त्यावरतीन मी निर्दोष
ठरस अस नही; मना न्यायनिवाडा करनारा प्रभु शे.
5 याकरता त्या येळना पहिले म्हणजे प्रभुना येवाना पहिले तुम्हीन न्यायनवाडा
करूच नका; तो अंधारमाधल्या गुप्त गोष्टी प्रकाशमा लई, अनी अंतःकरणमाधला
ईचार बी उघड करी; तवय प्रत्येक माणुसनी वाहवाह प्रभुकडतीन व्हई.

6 भाऊसवन, मीनी या गोष्टीसनं वर्णन तुमनाकरता दृष्टांतना रूपमा माले अनी
अपुल्लोसले लाई लेयल शेतस; यानाकरता की शास्त्रलेखपलीकडे कोणी जावाले
नको हाऊ नियम आमनावरतीन तुम्हीन शिकाले पाहिजे; म्हणजे तुमनापैकी कोणीच
एकमेकवर फुगावु नही.
7 तुले कोण दुसरासपेक्षा श्रेष्ठ समजस? अनी जे तुले देयल नही अस तुनाजोडे
काय शे? तुले देयल शे तरी देयल नही अस गर्व करीसन का बरं सांगत फिरस.
8 इतलामा तुम्हीन तृप्त व्हई जायेल शेतस, इतलामा तुम्हीन धनवान व्हई जायेल
शेतस, आमले सोडीन तुम्हीन तर राजा बनी जायेल शेतस; तुम्हीन राजा बनी जातात
तर बरं व्हतं कारण आमले बी तुमनासंगे राजपद भेटी जातं.
9 कारण माले वाटस, देवनी आम्हीन प्रेषितसले शेवटली जागाना अनी
मरणकरता नेमेल अस पुढे करी ठेयल शे, कारण आम्हीन जगले म्हणजे देवदूतसले
अनी मनुष्यसले खेळ असा व्हयेल शेतस.
10 आम्हीन ख्रिस्तमुये मुर्ख, तुम्हीन ख्रिस्तमा हुशार; आम्हीन अशक्त शेतस
अनी तुम्हीन ताकदवान; तुम्हीन प्रतिष्ठीत शेतस, अनी आमले मानपान भेटत नही.
11 ह्या येळपावत आम्हीन अशक्त, भूका तिशा अनं उघडा शेतस; आम्हीन मार
खातस अनी आमले घरदार नही;

12 ✡आम्हीन आमना हातघाई कष्ट करतस, जवय आमनी निंदा व्हस तवय
आम्हीन आशिर्वाद देतस, जवय आमले त्रास देतस तवय आम्हीन सहन करतस.
13 जवय आमनी बदनामी व्हस तवय आम्हीन समजाडाना प्रयत्न करतस.
आम्हीन जगना गाळ, सर्व प्रकारना कचरा बनेल शेतस.
14 तुमले लाज वाटाले पाहिजे म्हणीन मी हाई नही लिखी राहीनु तर मना प्रिय
पोऱ्यासप्रमाणे तुमले सुचना देवाकरता लिखी राहीनु.
15 तरी तुमले ख्रिस्तमा दहा हजार गुरू राहीनात पण जास्त बाप नही;
16 ✡यामुये मी तुमले ईनंती करस की, मनं अनुकरण करनारा बना.
17 या कारणमुये प्रभुमा मना प्रिय अनं ईश्वासु पोऱ्या तीमथ्य याले मी तुमनाकडे
धाडेल शे; तो तुमले मना शिक्षणपध्दतीनी आठवण करी दि, जसं मी सर्व ठिकाणवर,
प्रत्येक मंडळीमा शिकाडस.
18 मी तुमनाकडे येस नही म्हणीन बराच जण फुगेल शेतस.
19 तरी प्रभुनी ईच्छा व्हई तर मी तुमनाकडे लवकरच येसु; तवय फुगेल काय
बोलतस त्यानाकडे नही तर त्यासना सामर्थ्यकडे दखसु.
20 कारण देवनं राज्य बोलामा नही, तर सामर्थ्यमा शे.
21 तुम्हले काय पाहिजे? मी तुमनाकडे काठी लिसन येऊ का प्रेमतीन अनं
नम्रताना आत्मातीन येऊ?

# 5

## मंडळीमा अनैतीकता

1 अस ऐकामा येल शे की, प्रत्येक्ष तुमनामा व्यभिचार चालु शे अनी असा
व्यभिचार जो गैरयहूदी लोकसमा बी नही ऱ्हास म्हणजे तुमनापैकी एक माणुसनी
आपला बापनी बायकोले ठेयल शे.
2 तरी तुम्हीन फुगीसन बठेल शेतस; त्यानापेक्षा हाई कर्म करनारा माणुस
आपलामातीन कायमना निंघी गया अस म्हणीसन शोक करत बठाले पाहिजे.
3 मी शरीरतिन नही पण आत्मातीन तुमनामा उपस्थित शे. अनी अस समजा मी
उपस्थित राहीन अस घाण काम करनारा व्यक्ती विरूध्द निर्णय दि टाकेल शे.
4 जवय तुम्हीन आपला प्रभु येशुना नावतीन एकत्र व्हशात अनी आत्मामा बी
मी तुमनासंगे राहसु, तर आपला प्रभु येशुना सामर्थ्यतीन

---

✡ **4:12** ४:१२ प्रेषित १८:३ ✡ **4:16** ४:१६ १ करिंथ ११:१; फिलप्पै ३:१७

5 असा मनुष्यले शरिरना नाशकरता सैतानले सोपी देवाले पाहिजे, याकरता की,
त्याना आत्मा प्रभु येशुना दिनसमा उध्दार पावाले पाहिजे.
6 ✡हाई तुमनं बढाई करनं शोभस नही, थोडसं खमीर पुरा गोळाले फुगाडस,
हाई तुमले माहीत नही का?
7 म्हणीसन जुनं खमीर काढी टाका, यानाकरता की तुम्हीन जसं बेखमीर लोके
शेतस तसं तुम्हीन नवा गोळा व्हई जावानं, कारण आपला वल्हांडणना यज्ञपशु जो
ख्रिस्त त्यानं अर्पण व्हई जायेल शे.
8 यामुये जुना खमीरपाईन तसच वाईटपणा अनं दुष्तपणा यासना खमीरतीन नही
तर सात्विकपणा अनं खरंपण हया भाकरीसघाई आपण सण साजरा कराले पाहिजे.
9 तुम्हीन व्यभिचारीसनी संगत धरू नका अस मी तुमले आपला पत्रमा लिखेल
व्हतं.
10 या जगना व्यभिचारी, लोभी, लुटारू अनं मुर्तिपुजक यासनी संगत धरू नका
अस मी नही सांगस; कारण ती संगत धरी नही तर तुमले जगमातीन जानं पडी.
11 तर तुमले जे लिखेल व्हतं त्याना अर्थ असा की, भाऊ मानेल असा कोणी
व्यभिचारी, लोभी, मुर्तिपुजक, गाळ्या देणारा, दारूड्या, किंवा लुटारू व्हई तर
असासनी संगत धरानी; त्यासना पंगतमा बसानं नही.
12 कारण बाहेरनासना न्याय कराशी मना संबंध? काय तुमले त्यासना न्याय
नही कराना का ज्या मझार शेतस.
13 बाहेरसना न्याय तर परमेश्वर करस, पण तुम्हीन असा दुष्टसले आपलामातीन
बाहेर काढा.

# 6

## ख्रिस्ती लोकसना न्यायालयमा जायेल भांडणं

1 जर तुमनामा भांडणं व्हतस तर तुमनामा कोणी असा शे का? जो आपलं भांडण
अधार्मिकसकडे सोडावनी हिम्मत करस.
2 पवित्र लोक जगना न्यायनिवाडा करतीन हाई तुमले माहीत नही का? अनी
जर तुमना कडतीन जगना न्याय व्हई तर काय तुम्हीन ह्या धाकला धाकला भांडणं
सोडावाना योग्य नही शेतस का?
3 आपण देवदूतसना न्यायनिवाडा करू हाई तुमले माहीत नही का? तर मंग
आपण या जगना न्याय कराले योग्य नही का?

---

✡ **5:6** ५:६ गलती ५:९

4 तुमले व्यवहारीक खटलासना न्यायनिवाडा करना शे, तर मंडळीमा ज्यासनी
किमंत्तच नही त्यासले कसाले नेमतस.
5 तुमले लाज वाटाले पाहिजे म्हणीन सांगी राहीनु, काय तुमनामा एक पण शहाणा
माणुस नही, जो आपला भाऊसंगे भांडण सोडाऊ शकस.
6 भाऊ भाऊवर खटला चालाडस अनं तो बी अईश्वासी लोकससमोर.
7 तुम्हीन एकमेकसवर खटला चालडतस यानामा तुमनं नुकसानच शे;
त्यानापेक्षा तुम्हीन अन्याय का बर सहन करतस नही? त्यानापेक्षा तुम्हीन लुबाडणूक
का बर सहन करतस?
8 उलट तुम्हीन अन्याय अनी लुबाडणूक करतस, ती बी आपला भाऊससंगे.
9 अनितीघाई चालणारा माणुसले देवनं राज्यमा जागा मिळावं नही शे, हाई
तुमले माहीत नहीं का? फसु नका; जारकर्मी, मुर्तिपुजक, व्यभिचारी, चैनबाज,
समलींगी संबध ठेवणारा,
10 चोर, लोभी, दारूड्या, चुगलीचहाडी करनारा अनं व्यवहारमा घोटाया
करनारा, यासले देवना राज्यमा जागा मिळावं नही.
11 अनी तुमनापैकी कितला तसाच व्हतात; तरी तुम्हीन प्रभु येशु ख्रिस्तना नावमा
अनं आपला देवना आत्मामा धोयेल, पवित्र करेल, अनं नीतिमान ठरायेल, असा
व्हयेल शेतस.

## देवना गौरवकरता शरिरना वापर करा

12 ✡सर्व गोष्टीसनी माले सुट शे, तरी सर्वा गोष्टी कामना नहीत; सर्व गोष्टीसनी
माले सुट शे, तरी मी कोणतीच गोष्टना अधीन ऱ्हावाव नही.
13 अन्न पोटकरता अनं पोट अन्नकरता शे; त्या दोन्हीसना देव अंत करी, शरीर
व्यभिचारकरता नही, तर प्रभुसाठी शे; अनी शरीरकरता प्रभु शे.
14 देवनी प्रभुले ऊठाडेल शे, अनी तो त्याना सामर्थ्यतीन आपले ऊठाडी.
15 तुमना शरीर ख्रिस्तना अवयव शेतस, हे तुमले माहीत नही का? मी ख्रिस्तना
अवयव लिसन वेश्यानं शरीर बनाडु? कधीच नही.
16 ज्याना वेश्यासंगे संबध वना तो अनी ती ह्या एक शरीर शेतस, हाई तुमले
माहीत नही का? कारण त्या "दोन्ही एकदेह व्हतीन" अस तो म्हणस.
17 जो प्रभुना संगतमा येस तो अनं प्रभु एक आत्मा शेतस.
18 व्यभिचारपाईन दुर रहा, ज्या दुसरा पापे मनुष्य करस, त्या शरीर बाहेरतीन
व्हतस; पण जो व्यभिचार करस तो आपला शरिरबद्दल पाप करस.

✡ **6:12** ६:१२ १ करिंथ १०:२३

19 ✡काय तुमले माहीत नही का, तुमना मातीन प्रत्येकनं शरीर पवित्र आत्मानं
मंदिर शे, जो तुमनामा शे अनी जो तुमले परमेश्वर कडतीन भेटेल शे, अनं तुम्हीन
स्वतःना नही शेतस का?
20 कारण तुमले किंमत दिसन ईकत लेयल शे; यामुये तुम्हीन आपला शरीरतिन
देवनं गौरव करा.

# 7

## लगीनबद्दल प्रश्न

1 आते त्या गोष्टीसबद्दल ज्या तुम्हीन माले लिखेल शेतस. माणुसनी बाईले हात
लावाले नको हाई त्यानाकरता चांगलं शे.
2 व्यभिचार व्हई राहीनात म्हणीन प्रत्येक माणुसले स्वतःनी बायको अनी प्रत्येक
बाईले स्वतःना नवरा ऱ्हावाले पाहिजे.
3 नवरानी बायकोले तिना हक्क देवाले पाहिजे; अनी त्याप्रमाणे बायकोने बी
नवराले हक्क देवाले पाहिजे.
4 बायकोले स्वतःना शरिरवर अधिकार नही तर नवराले शे; अनी त्याप्रमाणे
नवराले बी स्वतःना शरिरवर अधिकार नही तर बायकोले शे.
5 एकमेकससंगे दगाबाजी करू नका, तरी प्रार्थनाकरता येळ मिळाले पाहिजे
म्हणीसन ती येळ एकमतघाई ठरावा, मंग फिरीसन एकत्र व्हा, यानाकरता की सैतान
तुमना असंयममुये तुमले परिक्षामा पाडाले नको.
6 तरी मी हाई परवानगी दिसन सांगी राहीनु आज्ञा दिसन नही.
7 मी जसं शे तस सर्वासनी ऱ्हावाले पाहिजे अशी मनी ईच्छा शे; तरी प्रत्येकले
ज्यानं त्यानं कृपादान देवपाईन मिळेल शे, एकले एक प्रकारनं अनं दुसराले दुसरा
प्रकारनं.
8 ज्या बिन लगीन व्हयेल शेतस अनं ज्या विधवा शेतस त्यासले मी सांगस, की,
तुम्हीन मनामायक राहीनात तर ते तुमनासाठे चांगलं शे;
9 पण ज्यासले धीर नही त्यासनी लगीन कराले पाहिजे, कारण जळापेक्षा लगीन
करेल बरं.
10 ✡लगीन व्हयेलसले मी आज्ञा करस, मी नही तर प्रभु करस, की बायकोने
नवराले सोडाले नको.

---

✡ **6:19** ६:१९ १ करिंथ ३:१६; २ करिंथ ६:१६ ✡ **7:10** ७:१० मत्तय ५:३२; १९:९; मार्क १०:११,१२; लूक
१६:१८

11 सोडा तर मंग तिनी बिन लगीन करानं ऱ्हावाले पाहिजे, किंवा नवरासंगे
तडजोड कराले पाहिजे; अनी नवरानी बायकोले सोडाले नको.
12 बाकिनासले प्रभु नही मी सांगस, जर एखादा भाऊले ईश्वासहिन बायको शे,
अनी ती त्यानासंगे नांदाले तयार शे, तर त्यानी तिले सोडानं नही.
13 ज्या बाईले अईश्वासु नवरा शे तो जर तिनासंगे ऱ्हावाले तयार शे, तर तिनी
त्याले सोडानं नही.
14 कारण बायकोकडतीन अईश्वासु नवरा पवित्र व्हयेल शे, अनी नवराकडतीन
बिनईश्वासु बायको पवित्र व्हयेल शे; अस नसतं तर तुमना पोऱ्यासोऱ्या अशुध्द
राहतात; पण आते त्या पवित्र शेतस.
15 जर अईश्वासु व्यक्तीनी वेगळी व्हवानी ईच्छा शे त्यानी वेगळं होऊ द्या, असा
परिस्थीतिमा भाऊ किंवा बहिण बांधेल नही शेतस, पण देवनी आपलाले शांतीमा
ऱ्हावाले बलायेल शे.
16 हे पत्नी, तु तुना नवराले तारशी किंवा नही, यानी तुले खात्री शे का? हे पती,
तु तुनी पत्नीले तारशी किंवा नही, यानी तुले खात्री शे का?

### देवनी सांगेल प्रमाणे जगानं

17 तर जश प्रत्येकले प्रभुनी वाटी देयल शे, जश प्रत्येकले देवनी बलायेल शे,
तस त्यानी चालाले पाहिजे अनी सर्व मंडळीसले मी हाईच आज्ञा देस.
18 सुंता व्हयेल माणुसले जर पाचारण व्हयनं तर त्यानी बेसुंतीसनामायक वागाले
नको; एखादा बेसुंती माणुसले पाचारण व्हयनं तर त्यानी सुंता करी लेवाले नको.
19 सुंता काहीच नही अनं बेसुंता बी काही नही, तर देवन्या आज्ञा पाळा हाईच
काय ते सर्व शे.
20 तुमले ज्या परिस्थीतीमा देवनी बलायेल शे, त्याच स्थितीमा ऱ्हा.
21 जर तु सेवक व्हता तवय तुले बलायेल शे का? त्यानी चिंता करू नको; पण
तुले जर स्वतंत्र व्हता ई, तर व्हई जा.
22 कारण दास राहीसन बी ज्याले प्रभुमा पाचारण व्हयनं, तो गुलामगिरीमातीन
मोकळा व्हयेल देवना माणुस शे; तसच मोकळ असतांना ज्याले पाचारण व्हयनं;
तो ख्रिस्तना दास शे.
23 तुम्हीन किंमत दिसन विकत लेयल शे, तुम्हीन मनुष्यना सेवक होऊ नका.
24 बंधुसवन, ज्या परिस्थीतिमा तुमले प्रत्येकले बलायेल शे, त्याच परिस्थीतिमा
तुम्हीन देवजवळ ऱ्हा.

## बिन लगीन व्हयेल अनी विधवा

25 आते कुवारीसबद्दल माले प्रभुकडतीन माले आज्ञा भेटनी नही, पण प्रभुना
दयातीन ईश्वासु ऱ्हावामुये मी मनं मत सांगस.
26 ते अस की, आतेनी परिस्थीतिमा माणुसकरता हाई चांगले शे की, जो ज्या
स्थितीमा शे, त्यानी त्याच स्थितीमा ऱ्हावाले पाहिजे.
27 तु बायकोले बांधेल शे का? बांधेल शे तर मोकळा व्हवाले दखु नको;
बायकोपाईन मोकळा शे का? मोकळा शे तर बायको कराले दखु नको.
28 पण तु जर लगीन करस तर पाप नही करस; अनी जर कुवारी लगीन करस
तर पाप नही करस. तरी बी असासले ह्या जिवनमा कष्ट व्हई अनी तुमनं रक्षण
व्हवाले पाहिजे अशी मनी ईच्छा शे.
29 भाऊसवन, मी हाईच म्हणस; येळ कमी करामा येल शे, याकरता की
आतेपाईन ज्यासले बायका शेतस, त्यासनी अस ऱ्हावाले पाहिजे जश त्यासले
बायको नही;
30 ज्या रडतस त्यासनी रडतस नही, ज्या आनंद करतस त्यासनी आनंद नही
करतस; ज्या विकत लेतस त्यासनी आपलाजोडे काहीच नही;
31 अनं ज्या जगना उपयोग करतस त्यासनी आपण त्याना उपयोग नही करतस
अस ऱ्हावाले पाहिजे; कारण या जगनं रूपांतर व्हई राहीनं.
32 तुम्हीन निश्चित ऱ्हावाले पाहिजे अशी मनी ईच्छा शे, बिन लगीन व्हयेल
माणुस, प्रभुले कश खूश करानं, अशी प्रभुना गोष्टीसबद्दल चिंता करस.
33 पण लगीन व्हयेल माणुस, आपली बायकोले कश खूश करानं असा जगन्या
गोष्टीसबद्दल चिंता करस;
34 लगीन व्हयेल अनं बिन लगीन व्हयेल बाई यासनामा बी फरक शे. बिन
लगीन व्हयेल ऱ्हास ती शरीरतिन अनं आत्मातीन बी कश पवित्र व्हवाणं, अशी
प्रभुना गोष्टीसबद्दल चिंता करस; पण लगीन व्हयेल ऱ्हास ती आपण आपला नवराले
कश खूश करानं असा जगन्या गोष्टीसबद्दल चिंता करतस.
35 हाई मी तुमना चांगला करता सांगस; तुमनावर फास टाकाकरता नही, तर
तुमना हातघाई उत्तम तेच व्हवाले पाहिजे अनं प्रभुनी सेवा एकचित्ततीन व्हवाले
पाहिजे.
36 जर कोणले अस वाटस की, तो त्याना कुवारी पोरना अपमाननं कारण व्हई
राहीना, ती उपवर व्हयेल शे अनी तसा अगत्यच शे, तर जशी ईच्छा व्हई तसं
त्यानी करानं, तो पाप करस नही, त्यानी लगीन करी लेवानं.

37 पण ज्यानी कुवारीसंगे लगीन नही कराना निर्णय लियेल शे, ज्याले कसानी
बळजबरी नही अनं ज्यानी ईच्छावर सत्ता शे अनी अस ज्यानी मनमा ठरायेल शे
तो चांगलं करस.
38 म्हणीसन जो कुवारी पोरंन लगीन करी देस तो चांगला करस, पण लगीन
करी देस नही तो अधिक चांगला करस.
39 नवरा जिवत शे तोपर्यंत बायको बांधेल शे; नवरा मरानंतर तिनी ईच्छा शे
त्यानाबरोबर, पण फक्त प्रभुमा लगीन कराले मोकळी शे;
40 जर ती लगीन न करता तशीच ऱ्हायनी तर मना ईचारतीन ती जास्त सुखी
राही; अनी माले वाटस, देवना आत्मा मनामा बी शे.

# 8

## मुर्तिले चढायेल नैवेद्य

1 मुर्तिनं नैवद्यबद्दल, "आपला सर्वासले ज्ञान शे," हाई आपले माहीत शे. ज्ञान
फुगाडस; पण प्रेमतीन प्रगती व्हस.
2 जर कोणी समजस की, माले एखादी गोष्ट कळस, तर जसं त्याले कळाले
पाहिजे त्याप्रमाणे त्याले अजुन कळेल नही शे.
3 जर कोणी देववर प्रेम करस तर, देवले त्यानी वळख व्हयेल ऱ्हास.
4 आपले मुर्तिनं नैवद्य खावाबद्दले माहीत शे की, जगमा ज्या मुर्त्या शेतस त्यासमा
देवसनं अस्तित्व नही शे, अनी एकशिवाय दुसरा देव नही.
5 जर आकाश अनं पृथ्वीवर सांगेल बराच देव शेतस, जश की, बराच देव अनी
प्रभु शेतस बी,
6 पण आमनाकरता तर एकच देव शे, म्हणजे बाप, ज्यानी सर्वकाही बनाडेल शे
अनी ज्यानाकरता आपण बी शेतस, एकच प्रभु येशु ख्रिस्त शे, ज्यानाद्वारे सर्वकाही
व्हयनं अनी ज्यानाद्वारे आम्हीन बी शेतस.
7 हाई ज्ञान सर्वासकडे ऱ्हास अस नही तर कितलासवर मुर्तिना सवयीसना
संस्कार अजुन बी असामुये त्या लोके मुर्तिनं नैवद्य म्हणीसन खातस, त्यामुये त्यासना
मन दुर्बळ असामुये ते विटाळस.
8 पण जेवण आपलाले देवनाजोडे नही लई जास, जर आम्हीन नही खातस तर
आपलं काही कमी नही व्हस, अनी आपण जर खातस तर आपलं काही वाढस
नही.

9 तुमना हाऊ मोकळेपणा दुसरासले आडफाटानं कारण व्हवाले नको म्हणीन
संभाळा.
10 कारण ज्ञानवान असा जो तु, त्या तुले मुर्तिना मंदिरमा जेवाले बशेल अस
कोणी दखं तर, तो मनतीन दुर्बळ असावर, त्याना मनमा मुर्तिनं नैवद्य खावानं धाडस
ईच ना?
11 त्याप्रमानतीन जो मनतीन दुर्बळ, ज्यानाकरता ख्रिस्त मरना असा बंधु, त्याना
तुना हाई ज्ञान मिळता नाश व्हस.
12 भाऊविरूध्द अस पाप करीसन अनं त्याना अशक्त मनले धक्का दिसन
तुम्हीन ख्रिस्तविरूध्द पाप करतस.
13 जर या जेवणमुये मना भाऊले आडफाटा व्हस, तर मी त्याले आडफाटा
व्हवाले नको, म्हणीन मी कधीच मांस खावाव नही.

# 9

## प्रेषितसना अधिकार अनी काम

1 मी मोकळा नही शे का? मी प्रेषित नही शे का? आपला प्रभु येशु याले मी
दखं नही का? प्रभुमा मना कामनं प्रतिफळ तुम्हीन नही शेतस का?
2 जर मी दुसरासकरता प्रेषित नही पण तुमनाकरता तर शे; कारण तुमनी प्रभुमा
एकता हाईच मना प्रेषितपणानं प्रमाण शे.
3 मनी चौकशी करनारासले मनं हाईच उत्तर शे.
4 आमले कष्ट करीसन खावापेवाणा अधिकार नही का?
5 दुसरा प्रेषित, प्रभुना भाऊ अनं केफा यानाप्रमाणतीन आमले बी ईश्वासु बहिणले
पत्नी करीसन सोबत लई जावाना हक्क नही काय?
6 मी अनं बर्णबाचं आम्हीनच कामधंदा करीसन खावानं का?
7 आपला पैसा खर्च करीसन सैन्यमा सेवा करस, असा कोण शे? द्राक्षमया
लाईन त्यानं फळ खास नही अस कोण शे? असा कोण शे, जो मेंढरं पाळस अनं
त्यासनं दुध पेस नही?
8 मी माणुसना रितप्रमाणे हाई बोलस का? नियमशास्त्र बी अस नही सांगस का?
9 ✡मोशेना नियमशास्त्रमा अस लिखेल शे की, “बैल मळणी करस तवय त्याले
त्यानं तोंड नही बांधाणं” काय देवले फक्त बैलसनीच चिंता शे का?

---

✡ **9:9** ९:९ १ तिमथ्य ५:१८

10 का तो सर्वकाही आपलाकरताच सांगस; हा, आमनाकरताच लिखेल व्हतं;
असा अर्थतीन की जो नांगरस त्यानी आशा धरीन नांगराणं, अनी जो कापणी करस
त्यानी ती, त्यामातीन वाटा भेटी ह्या आशातीन कराले पाहिजे.
11 ✡आम्हीन तुमनाकरता अध्यात्मिक वस्तुसनी पेरणी करेल शे, तर आम्हीन
तुमना जगीक वस्तुसनी कापणी करी तर त्यानामा काय मोठी गोष्ट शे?
12 जर तुमनावर दुसरा लोक अधिकार गाजाडतस तर काय तुमनावर आमना
अजुन अधिकार नही? तरी बी आम्हीन ह्या अधिकारना वापर नही करा, पण
ख्रिस्तना सुवार्तांले काही अडचण येवाले नको म्हणीन आम्हीन सर्वकाही सहन
करतस.
13 मंदिरमा सेवा करनारा मंदिरमाधल खातस अनी वेदीजोडे सेवा करनारा
वेदीवर जे अर्पण करेल शे त्याना भागीदार व्हतस हाई तुमले माहीत नही का?
14 ✡याप्रमाणे देवनी आज्ञा करेल शे की, ज्या सुवार्ता सांगतस त्यासनी सुवार्तावर
आपलं जिवन जगानं.

15 मी यातीन कोणताच अधिकारना वापर करेल नही अनं यानाप्रमानं माले
भेटाले पाहिजे म्हणीसन मी हाई लिखं नही कारण हाऊ स्वाभिमान कोणी व्यर्थ करी
यानापेक्षा मी मरी जायेल हाई बरं.
16 जर मी सुवार्ता सांगस तर माले गर्व करानं कारण नही; ती सांगानं माले आज्ञा
प्राप्त शे, मी सुवार्ता सांगस नही तर मना धिक्कार असो.
17 मी हाई मना ईच्छातीन करस तर माले वेतन मिळी, अनी मी कर्तव्य म्हणीसन
करस, कारण माले देवनी कारभार सोपेल शे.
18 तर मंग मनं वेतन काय? हाईच की मी सुवार्ता फुकट सांगाले पाहिजे अनी
सुवार्ताबद्दल जो मना अधिकार शे तो मी पुरा वापराले नको.

19 मी सर्वासपाईन मोकळा व्हतु तरी जास्त लोकसले देवना राज्यमा आनाकरता
मी स्वतःले दुसरासना दास बनाडी लेयल शे.
20 यहूदी लोक मिळावाकरता मी यहूदी लोकसले यहूदी लोकसमायक व्हयनु;
मोशेना नियमशास्त्रले अधीन नव्हतु तरी नियमशास्त्र अधीन असा व्हयनु.
21 ज्यासले नियमशास्त्र नही असा गैरयहूदीसले मिळाडाकरता असासले मी
नियमशास्त्र नही असा व्हयेल शे तरी देवना नियमशास्त्र बाहेर व्हतु असा व्हयनु
नही, मी ख्रिस्तना नियममा व्हतु

✡ **9:11** ९:११ रोम १५:२७ ✡ **9:14** ९:१४ मत्तय १०:१०; लूक १०:७

22 दुर्बळ लोकसले मिळावाकरता मी दुर्बळसले दुर्बळ व्हयनु. मी सर्वासकरता
सर्वकाही व्हयनु, याकरता की, कश तरी बराच लोकसनं तारण कराले पाहिजे.
23 मी सर्वकाही सुवार्ताकरता करस, याकरता की मी दुसराससंगे तिना भाग
व्हवाले पाहिजे.
24 शर्यतमा पयणारा सर्वाच पयतस, पण एकलेच बक्षीस मिळस हाई तुमले
माहीत नही का? तुमले ते मिळी अस पळा.
25 स्पर्धाकरता मेहनत करनारा प्रत्येक माणुस सर्वा गोष्टीसमा संयमन करस. त्या
नाशवंत बक्षीस मिळाडाकरता करतस, पण आपण अविनाशी बक्षीस मिळडाकरता
करतस.
26 मी पण तसाच पयस, म्हणजे अनिश्चीतपणातीन मी धावत नही. तशी
कुस्तीपण करस, म्हणजे वारावर मी बुक्क्या मारस नही.
27 तवय मी आपला शरिरले पकडीसन दास करसु, अनं मी असं कर नही मी
दुसऱ्यासना घोषणा करेल वर मी अपात्र ठरसु.

# 10

## मुर्तिसबद्दल इशारा

1 भाऊसवन, आपला सर्वाच पुर्वज ढगखाल व्हतात, अनी समुद्रमातीन त्या पार
गयात; हाई गोष्टबद्दल तुम्हीन अजाण ऱ्हावाले पाहिजे अशी मनी ईच्छा नही
2 ढग अनी समुद्र यासनाघाई मोशेमा त्या सर्वासना बाप्तिस्मा व्हईना.
3 सर्वासनी, एकच अध्यात्मिक जेवण करं;
4 अनी सर्वासनी एकच अध्यात्मिक पाणी पिधं, कारण त्या आपलासंगे
चालणारा खडकमातीन पि राहींतात; तो खडक ख्रिस्त व्हता.
5 तरी त्यासनातीन बराच लोकसबद्दल देव प्रसन्न नव्हता; यामुये त्यासना
शरिरना जंगलमा नाश व्हयना.
6 ह्या गोष्टी आमनाकरता दृष्टांत असा व्हयनात, की आम्हीन बी वाईट गोष्टीसना
लोभ धराले नको, जशा त्यासनी धरेल व्हता.
7 त्यासनापैकी कितला मुर्तिपुजक व्हतात तस होऊ नका; “लोके खावाले पेवाले
बसनात, नंतर खेळाले ऊठनात,” अस शास्त्रमा लिखेल शे.
8 अनी आपण व्यभिचार कराले नको; जशा त्यासनापैकी बराच जणसनी करा
अनं एक दिनमा त्या तेवीस हजार मरी पडनात.

9 अनी आपण प्रभुनी परिक्षा कराले नको, जशी त्यासनापैकी बराच जणसनी
करी अनी त्यासना सापसकडतीन नाश व्हयना.
10 तुम्हीन कुरकुर करू नका, जशी त्यासनापैकी बराच जणसनी करी अनी नाश
करनारासकडतीन त्यासना नाश व्हयना.
11 ह्या गोष्टी त्यासनाकरता दृष्टांत मायक व्हयन्यात; अनी ह्या आपले चेतावणी
करता लिखाई गयात ज्यानावर या युगना शेवट येल शे.
12 यामुये आपण उभा शेतस अस ज्यासले वाटस त्यासनी पडाले नको म्हणीन
संभाळा.
13 तुम्हीन असा परिक्षामा नही पडनात जी मनुष्यना शक्तीना बाहेर; अनी देव
ईश्वासपात्र शे, तो तुमनी परिक्षा तुमना शक्तीना पलीकडे व्हवु देवाव नही, तर
परिक्षासंगे तिनामातीन निंघाना उपाय बी करी, अस की, तुम्हीन ती सहन कराले
समर्थ व्हवाले पाहिजे.

### मुर्तिपुजा अनं प्रभुभोजन

14 यामुये मना प्रिय भाऊसवन तुम्हीन मुर्तिपुजापाईन दुर रहा.
15 तुमले समजदार समजीसन मी तुमनासंगे बोलस; मी काय बोलस त्याना
तुम्हीनच ईचार करा.
16 ✡जो ख्रिस्तना रक्ताना प्याला आपण प्रभुभोजनमा वापरतस अनी ज्यानाबद्दल
परमेश्वरले धन्यवाद करतस अनी जवय आम्हीन तो पितस तवय त्याना रक्तमा
सहभागीता करतस अनं जवय आपण भाकर मोडीन खातस तवय ख्रिस्तना शरिरमा
सहभागीता करतस.
17 आपण बराच राहीन एक भाकर, एक शरीर असा शेतस; आपण सर्व त्या
एक भाकरना भाग शेतस.
18 इस्त्राएली लोकसकडे दखा; बळी खाणारा परमेश्वरना अर्पणसना भागीदार
नही शेतस का?
19 मनं सांगानं तात्पर्य काय शे? मुर्तिसमोर बली चढायेल वस्तु काहीतरी शे?
की, मुर्ति काहीतरी शे?
20 नही! पण मी हाई सांगस की, ज्या लोकसले देव माहित नही त्या लोके
जी बळी चढावतस, ती देवले नही तर भुतसले चढावतस; अनी तुम्हीन भूतसना
सहभागी व्हवाले पाहिजे अशी मनी ईच्छा नही.

---

✡ **10:16** १०:१६ मत्तय २६:२६-२८; मार्क १४:२२-२४; लूक २२:१९,२०

21 तुम्हीन प्रभुना प्याला अनं अनी भूतसना प्याला दोन्हीसमातीन नही पिऊ
शकतस; तुम्हीन प्रभुना मेज अनी भूतसना मेज दोन्हीसना सहभागी नही बनु
शकतस.
22 काय आम्हीन देवले राग आनी देवाना प्रयत्न करी राहिनुत का? काय आपण
त्यानापेक्षा बलवान शेतस?

